नियमित दिवाणी दावा ०६/२०१८

दत्तात्रय रामचंद्र शेटे वि.भगवान तुकाराम शेटे
नि.नं. ३७/लगत / सी

<u>उलटतपास प्रतिवादी तर्फे श्री. एम. डी. कराडे वकील यांच्यामार्फत शपथेवर सुरु,</u>

१२.प्रतिवादी हे नात्याने माझे चुलत भाऊ आहेत. माझे शिक्षण ११ वी पर्यंत झाले आहे. मी एस. टी महामंडळात नोकरी करत होतो. मी प्रथम कंडक्टर नोकरीस होतो व त्यानंतर माझी बढती वाहतुक नियत्रंक म्हणून झाली होती. मी दि. ३१.०५.२०1३ रोजी सेवानिवृत्त झालेलो आहे. आमचे वडिलांमध्ये व प्रतिवादी यांच्या वडिलांमध्ये पूर्वी वाद–विवाद झालेला नव्हता. माझेमध्ये व प्रतिवादीमध्ये पूर्वी कधी व्यवहार झाला नव्हता.

१३. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतींचा सातबारा उतारा मी पाहिलेला आहे. माझ्या माहितीनुसार दावा मिळकतीचे क्षेत्र ९५ आर व ४ गुंठे पोट खराबा आहे. मी सदरची दावा मिळकत ही प्रतिवादी यास कोणत्या नोंदणीकृत दस्ताद्वारे आली आहे त्याची माहिती मी घेतली नव्हती. सदर मिळकत भगवान यांच्या पूर्ण मालकीची आहे याकरिता मी सातबारा उतारा दिलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदरचा सातबारा सोडून भगवान यास सदर मिळकत मिळाली हे दाखविणारा अन्य कागद अभिलेखावर मी दिलेला नाही. (नि. ३ सोबत अ. क्र. ४ वरील कागदपत्र साक्षीदारास दाखविण्यात आले.) हे म्हणणे खरे आहे की, आता मला दाखविण्यात आलेल्या सातबारा उतारामध्ये सदरची मिळकत ही भगवान यास मालकीने प्राप्त झाली असा मजकूर नमूद नाही. गिरीजाबाई, शालाबाई, धोंडूबाई, भारती व सखुबाई या प्रतिवादी यांच्या बहिणी आहेत. हे म्हणणे खरे आहे की, जे वादातित करारपत्र करण्यात आलेले आहे त्यामध्ये गिरीजाबाई, शालाबाई, धोंडूबाई, भारती व सखुबाई या पक्षकार नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, सदर करारपत्राच्या अनुषंगाने गिरीजाबाई,

शालाबाई, धोंडूबाई, भारती व सखुबाई यांनी प्रतिवादी यास संमती दिल्याचा कागद मी अभिलेखावर हजर केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या दाव्यामध्ये व मी हजर केलेल्या सातबारा उतारामध्ये क्षेत्राची तफावत आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर दावा मिळकत ही भगवान याच्या एकटयाच्या मालकीची आहे हे दाखविण्याकरिता माझ्या तोंडी पुराव्याखेरीज इतर कोणताही पुरावा नाही.

१४. हे म्हणणे खरे आहे की, गट क्र. २१९ हे पूर्वी तुकाराम शेटे यांच्या मालकीचे होते. हे म्हणणे खरे आहे की, तुकाराम मयत झाल्यानंतर त्यांच्या वारसांची नावे सातबारा सदरी नोंद झाली. माझ्या माहितीनुसार भगवान यास पत्नी असून त्यास दोन मुलगे आहेत. भगवान यास मुलगी नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदर करारपत्र करताना भगवान याची पत्नी व मुलांची संमती घेतली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, भगवान यांच्या पत्नी व मुलांनी करारपत्रास संमती दिली हे दाखविण्याकरिता माझ्या शब्दाखेरीज इतर पुरावा नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदर दावा मिळकत ही भगवान याचेकडून मी खरेदी करणार आहे त्या हरकत अनुषंगाने पेपर मध्ये नोटीस मी जाहीर केली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, सदर करार करणेपूर्वी भगवान व त्यांच्या बहिणी, पत्नी व मुले यांना सदर दावा मिळकत घेण्याबाबत लेखी नोटीस पाठविली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, सदर करार करणेपूर्वी पेपरमध्ये जाहीर नोटीस देण्यास मला अडचण नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, सदर करार करणेपूर्वी भगवान यांची पत्नी, मुले व बहिणी यांना लेखी नोटीस पाठविण्यास अडचण नव्हती. सदर वादातित करारपत्राचा मुद्रांक मी खरेदी केला होता. हे म्हणणे खरे आहे की,भगवान यास मला स्टॅम्प विकत आणून दे असे मी सांगितले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीच्या चतुःसिमा माझी मिळकत लागून नाही. माझी मिळकत दावा मिळकतीच्या पश्चिमेला लागून आहे. माझ्या दाव्यामध्ये चतुःसिमेमध्ये गोविंद शेटे यांच्या मिळकतीचा उल्लेख केलेला आहे तो बरोबर आहे. हे म्हणणे खरे नाही की, दाव्यातील

वर्णनाप्रमाणे पश्चिमेला माझी मिळकत नाही. सदर दावा मिळकतीच्या पश्चिमेस गोविंद यांचा उल्लेख चुकीचा आहे.

**<u>उलटतपास वकिलांच्या विनंतीवरुन पुढील तारखेपर्यंत तहकूब</u>**

सही/–

दि. ०३/१२/२०२५.

**( के. दि. काकतकर )**
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, पन्हाळा